दूरध्वनी : २८४ १५ ७६ / २०२ ६२ ४९ फॅक्स : २०२ ९३ ४८
ग्राम : पाणीमंडळ, मुंबई

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१

क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/2209

दिनांक : १२ ऑगस्ट,२००२

**परिपत्रक क्र.८१**

**विषय :** रेल्वे क्रॉसिंगच्या कामांबाबत कंत्राटदारांना दयावयाची पूर्वअर्हता.

रेल्वे क्रॉसिंगची कामे ही विशिष्ट पध्दतीने तसेच अधिक कुशलतेने करावी लागतात यासाठी कंत्राटदाराची पूर्वअर्हता ठरविताना अशा कामांचा अनुभव कंत्राटदारास आहे हे पहाणे अनिवार्य आहे. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे नोंदणीकृत ठेकेदारांनाच या कामाची पूर्वअर्हता दयावयाची ठरल्यास रेल्वे क्रॉसिंगच्या कामासाठी फारसे कंत्राटदार उपलब्ध होऊ शकणार नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे नोंदणीकृत ठेकेदारांना निविदा देण्याच्या अटीमध्ये शिथिलता देण्याचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या विचाराधीन होता. या अनुषंगाने दि.२५/७/२००२ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९३ बैठकीमध्ये सर्वकष चर्चा करण्यांत येवून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

**यापुढे रेल्वे क्रॉसिंगच्या कामासाठी फक्त महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील नोंदणीकृत कंत्राटदारांनाच निविदा देण्याच्या अटीमध्ये शिथिलता देण्यात येत आहे. त्यामुळे रेल्वे क्रॉसिंगच्या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग,रेल्वे खाते या विभागांकडे नोंदणीकृत असणाऱ्या ठेकेदारांना निविदा भरण्यास परवानगी देण्यात येत आहे. मात्र अशा कंत्राटदारांना खालीलप्रमाणे पूर्वअनुभव असणे आवश्यक आहे.**

**यापुढे रेल्वे क्रॉसिंगच्या कामाच्या ज्या निविदा मागविण्यात येतील त्या निविदांसाठी कंत्राटदारांची पूर्वअर्हता ठरवित असताना निविदेमध्ये ज्या पध्दतीचे रेल्वे क्रॉसिंगचे काम अंतर्भूत आहे त्या पध्दतीचे रेल्वे क्रॉसिंगचे काम कंत्राटदाराने त्या पूर्वी केलेले असणे आवश्यक आहे. तसेच निविदेमध्ये ज्या व्यासाचे पाईप्स् रेल्वे क्रॉसिंगसाठी टाकावयाचे आहेत त्या पाईप्सच्या व्यासाच्या किमान ७५% पेक्षा जास्ती व्यासाच्या पाईप्सचे काम कंत्राटदाराने पूर्वी केलेले असणे आवश्यक आहे. पूर्वअर्हता देण्यापूर्वी रेल्वे क्रॉसिंगच्या कामाचे पूर्वअनुभवाचे किमान अधीक्षक अभियंता स्तरावरील अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सदर कंत्राटदाराने सादर करणे आवश्यक आहे.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून यापुढे रेल्वे क्रॉसिंगच्या कामासाठी ज्या निविदा मागविण्यात येतील त्या निविदांसाठी वरीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.

(राजेंद्र सगणे)
सदस्य सचिव

प्रत :मा.मंत्री,ग्रा.वि.,पा.पु.व स्व.तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष,मंत्रालय, मुंबई यांचे माहितीसाठी सादर.
मा.राज्यमंत्री,पा.पु.व स्व.तथा प्राधिकरणाच्या उपाध्यक्षा,मंत्रालय,मुंबई यांचे माहितीसाठी सादर
मा.राज्यमंत्री,नगर विकास तथा प्राधिकरणचे उपाध्यक्ष,मंत्रालय, मुंबई यांचे माहितीसाठी सादर
सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे माहितीसाठी सादर.
सर्व मुख्य अभियंता,म.जी.प्रा. ............ यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
सर्व अधीक्षक अभियंता,म.जी.प्रा.मंडळ, ............ यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
सर्व कार्यकारी अभियंता,म.जी.प्रा.बां.विभाग, ............ यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

Circular-Mrr

मजीप्रा
रवाना
13 AUG 2002
मुंबई-२१.